# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/05/2023 (बुधवार) सकाळ


## मोटर सायकल चोरी करणारा अट्टल गुन्हेगार गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

नागपुर ग्रामिण जिल्हयात मोटरसायकल चोरींच्या घटना वाढत असल्याने त्यावर आळा घालण्या करीता मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामिण यांनी दिलेल्या सुचने वरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांनी त्याकरीता विशेष पथक स्थापन केले होते. दिनांक १६/०५/२०२३ रोजी सदर पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस ठाणे बुट्टीबोरी परिसरातुन संशयीत इसम नामे १) अभिषेक रामरतन फुन्ने, वय २० वर्ष, रा. बोरखेडी फाटक जवळ बुट्टीबोरी याला ताब्यात घेतले. त्याने विचारपुस दरम्यान सदर मोटर सायकलींची चोरी ही मौजमस्ती करीता पैशांची आवश्यकता असल्याने चोरी केल्याचे सांगीतले. त्यानुसार त्याने नागपुर ग्रामिण तसेच नागपुर शहर येथुन एकुण ०५ मोटर सायकली चोरी केल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यातुन पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथुन चोरी केलेल्या ०४ मोटर सायकल तसेच नागपुर शहर पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतुन चोरी केलेली १ मोटर सायकल अशा एकुण ५ मोटर सायकली किंमती अंदाजे २,९०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून नमुद आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील तपास कामी आरोपीची वैद्यकिय तपासणी करुन पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**उघडकीस आलेले मोटर सायकल चोरीचे गुन्हे**

१) पोलीस ठाणे बुटीबोरी अप. क्र. १०६/२३ कलम ३७९ भा.द.वि.

२) पोलीस ठाणे बुटीबोरी अप. क्र. २९३/२३ कलम ३७९ भा.द.वि.

३) पोलीस ठाणे बुटीबोरी अप. क्र. २९४/२३ कलम ३७९ भा.द.वि.

४) पोलीस ठाणे बुटीबोरी अप. क्र. २९५/२३ कलम ३७९ भा.द.वि.

५) पोलीस ठाणे बेलतरोडी नागपूर शहर अप. क्र. ४८/२० कलम ३७९ भा.द.वि.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विशाल आनंद साहेब (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार मिलिंद नांदुरकर, महेश जाधव, मयूर ढेकळे, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे यांचे पथकाने केली.



## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावर जिचकार सभागृह च्या समोर रोडवर ईतवारी पेठ उमरेड येथे दिनांक १६/०५/२०२३ चे १७/०० वा. ते १७/१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अश्विन नत्थुजी राऊत, वय २८ वर्ष रा. उकडी ता. भिवापुर जि. नागपुर हा त्याचे गावात राहणारी प्रेमा मरस्कोल्हे हिचे लग्न जिचकार सभागृह ईतवारी पेठ उमरेड येथे असल्याने **आरोपी नामे– रामा खटटु आदमने, वय ४३ वर्ष रा. अभ्यंकर चौक ईतवारी पेठ उमरेड** हा लग्न सभागृहात दारू पिऊन अंगात मळकट फाटलेले कपडे घातलेले दिसुन येत होता. तेव्हा त्यास फिर्यादीचे भावाने आरोपीस हटकुन असे म्हटले की ''तु इथुन निघुन जा'' असे म्हणत सभागृह बाहेर काढले. तोच राग मनात धरून सभागृह बाहेर वडाचे झाडाचे सिमेंट ओटयावर बसलेल्या आरोपीने फिर्यादी व त्याचे भाऊ यांना बघताच ''थांब तुमचा मुडदा पाडतो'' अशी धमकी देवुन निघुन गेला व थोडया वेळाने परत येउन फिर्यादीचे पाठीमागुन येऊन जिवाने ठार मारण्याच्या उददेशाने डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून फिर्यादीस गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश खोटेले पोस्टे उमरेड हे करीत आहे.

## मोटार चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील टेकाडी शिवार कन्हान येथे दिनांक १४/०५/२०२३ चे ०४/०० वा. ते दिनांक १५/०५/२०२३ चे १०/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— जमनागीर जाउफगीर गोस्वामी रा. टेकाडी हे दिनेश बुलानी यांच्या शेतीची देखरेख करतात तिथे रहतात. दि. १४/०५/२०२३ रोजी पाण्याची मोटर दिवसभर चालु होती सायंकाळी ४.०० वा. मोटर बंद केली व फिर्यादी आपल्या शेताच्या खोलीवर आराम करण्याकरीता निघुन गेला व दि. १५/०५/२०२३ ला १०.३० वा. शेतीची पाण्याची मोटर चालु करण्याकरिता गेले तर पाणी येत नव्हते ते बघण्यासाठी विहीरीत बघीतले वायर तुटले होते लोहेचे पाईप बाहेर पडले दिसले यावरून मशिन चोरी झाल्याबाबत समजले ही माहीती फिर्यादीने त्यांच्या शेत मालकाला दिली कोणीतरी अज्ञात चोराने शेतामध्ये बोरवेल जवळ ५ एच पी सोलर उर्जाची चालणारी मशिन जुनी किंमती १००००/— रू. चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चव्हान सा पोस्टे कन्हान मो नं ७३५०३६९७५१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**